पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ९
सभावृत्तांत

दिनांक- १०/३/२०१० वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १०/३/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
५. मा.उबाळे वैशाली संजय
६. मा.धराडे शकुंतला भाउसाहेब
७. मा.फुगे सुनंदाताई विजय
८. मा.आशा अंकुश लांडगे

याशिवाय मा.चाकणकर- उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक :- २) समता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेबाबत..मा.शकुंतला धराडे,मा.ज्योती भारती यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ३) विविध व्यवसाय प्रशिक्षणाकरीता अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेस मुदतवाढ देणेबाबत..
मा.सुषमा गावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक :- ४) बालवाडी शिक्षिकांच्या मानधनात वाढ करणेबाबत..मा.वैशाली उबाळे,मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव..

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक - मा. ज्योती भारती अनुमोदक - मा. सुषमा गावडे

सोमवार दिनांक २९/३/२०१० रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

मा.सभापती - सोमवार दिनांक २९/३/२०१० रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(लोखंडे सुजाता सुनिल)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ९
सभावृत्तांत
( दि.१०.३.२०१० ची तहकुब सभा)

दिनांक- २९/३/२०१० वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची दि.१०.३.२०१० ची तहकुब सभा सोमवार दिनांक २९/३/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.उबाळे वैशाली संजय
५. मा.धराडे शकुंतला भाउसाहेब
६. मा.आशा अंकुश लांडगे

याशिवाय मा.चाकणकर- उपनगरसचिव,मा.हरी भारती - प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सुषमा गावडे : दि.१०.२.२०१० रोजी झालेल्या सभेच्या सभावृत्तांतामध्ये पा.क्र.२ वर ओळ क्र. ३ मध्ये - “दिनांक १३/२/२०१०” या मजकुराऐवजी “दिनांक १३/१/२०१०” हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत यावी.

दिनांक १०/२/२०१० रोजी झालेल्या सभेच्या सभावृत्तांतामध्ये पा.क्र.२ वर ओळ क्र.३ मध्ये - “दिनांक १३/२/२०१०” या मजकुराऐवजी “दिनांक १३/१/२०१०” हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत आल्याचे व त्या दुरुस्तीसह दिनांक १०/२/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------

ठराव क्रमांक- २७ विषय क्रमांक- १
दिनांक- २९/३/२०१० विभाग- नागरवस्ती विकास
सूचक- मा.वैशाली उबाळे अनुमोदक- मा.आशा लांडगे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/२/कावि/१६७७/२००९ दि.२२.१०.२००९
विषय :- मे.मॅक्स टेलीकॉम एज्युकेशन सोसायटी (एम.टेल)पुणे या संस्थेमार्फत प्रशिक्षण देणेबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक- २
दिनांक - २९/३/२०१०
सूचक- मा.शकुंतला धराडे अनुमोदक-मा.ज्योती भारती
संदर्भ- मा.शकुंतला धराडे,मा.ज्योती भारती यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला बचतगट समता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमास प्रति महिला लाभार्थी प्रति दिन र.रू.१००/- या प्रमाणे दोन दिवसीय कार्यक्रम राबविणेस अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांना दि.३१/३/२०११ पर्यंत मुदतवाढ देणेस व या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक- ३
दिनांक - २९/३/२०१०
सूचक - मा.सुषमा गावडे अनुमोदक- मा. शकुंतला धराडे
संदर्भ- मा.सुषमा गावडे, मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिलांना विविध व्यवसाय प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था गेल्या ३ वर्षांपासून चांगल्याप्रकारे राबवित असल्या कारणाने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांना दि.३१/३/२०११ पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत यावी अशी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक- ४

दिनांक - २९/३/२०१०

सूचक- मा.वैशाली उबाळे अनुमोदक-मा.सुषमा गावडे

संदर्भ- मा.वैशाली उबाळे,मा.सुषमा गावडे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ विभागामार्फत बालवाडया चालविल्या जातात या बालवाडयांमध्ये ज्या शिक्षिका मानधन तत्वावर काम करतात. त्या शिक्षिकांच्या मानधनात .

| | सेवा कालावधी | मानधन र.रु. |
|---|---|---|
| १) | २ ते ४ वर्षे | ३०००/- |
| २) | ४ ते ६ वर्षे | ३५००/- |
| ३) | ६ ते ८ वर्षे | ४०००/- |
| ४) | ८ ते १० वर्षे | ४५००/- |
| ५) | १० ते १२ वर्षे | ५०००/- |
| ६) | १२ ते १४ वर्षे | ६०००/- |
| ७) | १४ ते १६ वर्षे | ६५००/- |
| ८) | १६ ते १८ वर्षे | ७०००/- |
| ९) | १८ ते २० वर्षे | ७५००/- |
| १०) | २० ते २२ वर्षे | ८०००/- |

उपरोक्तप्रमाणे वाढ करण्यास तसेच मुख्य समन्वयक यांना र.रु. १०,०००/- मानधन देण्यास मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती मार्फत मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(लोखंडे सुजाता सुनिल)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक- नस/९/कावि/४५०/२०१० सही/-
दिनांक - १/ ४ /२०१० उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.